# सहकारी संस्थांच्या उपविधी दुरूस्तीची प्रकरणे

सहकारावरील राज्य सरकारांचे नियंत्रण कमी करणारा कायदा केंद्र सरकारने केला असून, १५ फेब्रुवारी २०१३ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सक्तीची झाली आहे. (न्यायप्रविष्ट राज्ये वगळता) या कायद्यामुळे महाराष्ट्रातील सुमारे साडेपाच कोटी जनतेचे थेट संबंधित असलेल्या सहकार चळवळीवरचे सरकारचे नियंत्रण कमी होणार असल्यामुळे, महाराष्ट्र राज्य सरकारने या कायद्याला कडाडून विरोध केला होता, परंतु हा विरोध घटनाबाह्य असल्यामुळे त्यावर केंद्रात लोकसभा व राज्यसभेत साधी चर्चासुध्दा झाली नाही.



महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारणपणे २ लाख २७ हजार सहकारी संस्था नोंदणीकृत असून राज्यातील निम्मी जनता ह्या सहकार चळवळीशी संबंधित आहे. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१२ मध्ये सहकार कायद्यात ९७ वी घटना दुरूस्ती केली. १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत केंद्राच्या कायद्यानुसार राज्यांच्या कायद्यांमध्ये बदल करण्याचे आदेश दिले गेले. जर राज्य सरकारांनी हे बदल केले नाहीत तर, केंद्राच्या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रासह देशातील संबंधित राज्यांना (न्यायप्रविष्ट राज्ये वगळता) सक्तीने लागू होणार आहे किंबहुना तशीच वस्तुस्थिती आहे.

केंद्राने घटनादुरूस्तीद्वारे सहकार कायद्यात अनेक बदल केले. त्यामुळे राज्य सरकारच्या नियंत्रणाला जबरदस्त धक्का बसला. आणि अशा एकंदरीत अनेक महत्त्वाच्या घटना कशा घडल्या त्यांचा घटनाक्रम खालीलप्रमाणे :

१. सहकार घटना दुरूस्ती १४ व्या लोकसभेसमोर १०७ व्या विधेयकाच्या स्वरूपात सर्वप्रथम मांडली, पण संमत झाली नाही.

२. हेच विधेयक बदल करून १११ व्या घटना दुरूस्ती विधेयकाच्या स्वरूपात १५ व्या लोकसभेसमोर मांडले गेले.

३. डिसेंबर २०११ मध्ये लोकसभा व राज्यसभा ह्या दोन्ही सभागृहांत हे विधेयक बहुमताने संमत झाले.

४. मा. राष्ट्रपतींची १२ जानेवारी २०१२ रोजी ह्या विधेयकावर स्वाक्षरी झाली आणि ह्या प्रकारे

घटना दुरूस्तीला अंतिम मान्यता मिळाली.

५. राजपत्रात १३ जानेवारी २०१२ रोजी प्रसिध्द विधेयकाचे ९७ व्या घटना दुरूस्तीत रूपांतर झाले.

६. केंद्राने या घटना दुरूस्तीच्या अंमलबजावणीची तारीख १५ फेब्रुवारी २०१२ निश्चित केली.

७. केंद्राच्या घोषणेनुसार १५ फेब्रुवारी २०१२ पासून घटना दुरूस्ती अंमलात आली.

८. देशातील सर्व राज्यांनी सहकार कायद्यात एक वर्षात बदल करण्याची केंद्राने सुचना केली.

९. राज्यांनी विविध मुदतीत बदल केले नाही तर, १५ फेब्रुवारी २०१३ पासून घटना दुरूस्ती जशीच्या तशी संपुर्ण देशात सर्व राज्यांना लागू झाली. (न्यायप्रविष्ट राज्ये वगळता)

असा ९७ व्या घटना दुरूस्तीचा घटनाक्रम आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सरकाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ह्या सहकार कायद्यामध्ये या घटना दुरूस्तीचा आधार घेवून घटनात्मक दुरूस्ती व राज्याच्या सहकार कायद्यातील प्रस्तावित दुरूस्ती / तरतुदी खालीलप्रमाणे आणण्याचे प्रस्तावित केले.

१. सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी राज्य लेखापरिक्षक पॅनलची स्थापना.

२. संचालक मंडळाची संख्या २१ पर्यंत मर्यादित.

३. संचालक मंडळाची मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती व महिलांना आरक्षण.

४. लेखापरिक्षणात सलग ३ वर्षे अ वर्ग मिळणाऱ्या जिल्हा बँकेतच ठेवी.

५. विद्यमान संचालकांना मुदत पुर्ण करता येणार.

६. सक्रिय सभासदास मतदानाचा अधिकार.

७. सक्रिय सभासद होण्यासाठी ५ वर्षातून एकदातरी संस्थेच्या सेवांचा लाभ घेणे बंधनकारक.

८. थकबाकीदार सभासद मतदानास अपात्र.

९. कोणत्याही कारणाने निवडणूक पुढे ढकलता येणार नाही.

१०. आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यांत वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे सक्तीचे.

११. हाऊसिंग सोसायट्यांना कलम १०१ नुसार वसुलीचे अधिकार.

१२. बिगरशेती कर्जाची दामदुप्पट मर्यादा ३ हजारांवरून १० हजार रूपये.

१३. शिखर संस्थांचा लेखापरिक्षण अहवाल विधीमंडळापुढे येणार.

१४. मंत्र्यांना सहकारी संस्थांमध्ये पदाधिकारी होण्याची तरतुद.

१५. कलम ८३ ची चौकशी ६ महिन्यात.

१६. कलम ८८ ची चौकशी २ वर्षांच्या आत पुर्ण करणे बंधनकारक.

१७. सहकारी संस्थांसाठी स्वतंत्र निवडणूक प्राधिकरणाची स्थापना.

अशाप्रमाणे ९७ वी घटनादुरूस्ती व महाराष्ट्र राज्याचा सहकारी कायदा व त्या अनुषंगाने व महाराष्ट्र राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी दि. २२/२/२०१३ रोजी परिपत्रक जाहीर करून खालील आदेश दिले.

जा.क्र. प्रशासन/ ९७ वी घ.दु.सुधारणा/ २०१/१०२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक : २२/२/२०१३

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था सर्व

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सर्व मुंबई

**विषय :** राज्यघटना (९७ वी दुरूस्ती) अधिनियम, २०११ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये करावयाच्या सुधारणांबाबत.

**संदर्भ :** शासनाकडील दिनांक १५/२/२०१३ रोजीचे पत्र.

राज्यघटना (९७ वी दुरूस्ती) अधिनियम, २०११ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम१९६० मध्ये सुधारणा करण्यासंबंधीचा अध्यादेश दि. १४ फेब्रुवारी २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने राज्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी कायद्यातील तरतुदीशी

सुसंगत असे आदर्श पोटनियम तयार करून संबंधित संस्थांना लागू करण्याची कार्यवाही तत्परतेने करणे आवश्यक आहे. यासंबंधीचा संभाव्य कालबध्द कृती कार्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे :-

| | |
|---|---|
| आदर्श उपविधी तयार करणे | १६ फेब्रुवारी, २०१३ |
| • आदर्श उपविधीची सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यासाठी संचालक मंडळ सभा बोलाविणे. | ५ मार्च, २०१३ |
| • आदर्श उपविधी मंजुरीसाठी संबंधित संस्थांनी विशेष सर्वसाधारण सभा बोलाविणे. | १५ एप्रिल, २०१३ |
| • संबंधित संस्थांनी उपविधी दुरूस्तीसंबंधी मंजुरीचे प्रस्ताव निबंधकाकडे सादर करणे. | २० एप्रिल, २०१३ |
| • निबंधकाने संबंधित संस्थांच्या उपविधी दुरूस्ती मंजुरीबाबत निर्णय देणे. | ३० एप्रिल, २०१३ |

आपणास विनंती की, वर नमूद केलेल्या कालबध्द कृती कार्यक्रमानुसार सर्व कार्यवाही मुदतीत पार पाडावयाची असल्यामुळे, सदरची कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करण्यात यावी व आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांना तात्काळ निर्देश देण्यात यावेत.

**(मधुकर चौधरी)**
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात २ लाख २७ हजार सहकारी संस्थांपैकी किती सहकारी संस्थांनी उपविधी दुरूस्तीची / सुधारणेची / आदर्श उपविधी स्विकारण्याची विहित नमुन्यात प्रकरणे निबंधकाकडे दाखल केली ? किती मंजुर झाली ? किती नामंजुर झाली ? नामंजुरीची कारणे काय ? प्रकरणे निलंबित का ठेवली ? ह्याचे उत्तर राज्य सरकारकडे किंवा मा. सहकार आयुक्तांकडे ह्या क्षणाला नाही. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १३ नुसार मा. निबंधकास एखाद्या सहकारी संस्थेत उपविधीत केलेली कोणतीही सुधारणा विहित नमुन्यात कायद्यानुसार मा. निबंधकाकडे दाखल केली तर तो अर्ज मिळालेल्या तारखेपासून २ महिने मुदतीच्या आत निकालात काढण्याची कायदेशीर जबाबदारी कलम १३ नुसार मा. निबंधकाची आहे. परंतु राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या बाबतीत ही मुदत केवळ १ महिन्याची आहे. कलम १३ च्या १ नुसार जर निबंधकाने प्रकरण सादर केल्यानंतर १५ दिवसांचे आत संबंधित संस्थेस यथास्थिती कळविणे आवश्यक आहे. अशा वरिष्ठ अधिकाऱ्याने किंवा राज्यशासनाने त्या कालावधीत तो अर्ज निकालात काढण्यास कसूर केल्यास उपविधीत सुधारणेची नोंदणी करण्यात आल्याचे मान्य करण्यात येईल.

तसेच कलम १३ (१) ब नुसार राज्यशासनाने कलम ४ खाली जर कोणतेही धोरण विषयक निर्देष काढले असतील व ती सुधारणा या निर्देशांच्या विरूध्द असेल अशा, संस्थेच्या उपविधीमध्ये करण्यात आलेली कोणतीही सुधारणा निबंधक या कलमाखाली नोंदवणार नाही. किंवा ज्या उपविधीची नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात आले असेल, त्या उपविधीमध्ये केलेली सुधारणा अंमलात येणार नाही. म्हणजेच राज्य सरकार व सहकार खाते उपविधी दुरूस्तीच्या संदर्भात कुठलेही धोरण स्विकारू शकते. परंतु घटनाबाह्य धोरण स्विकारून कायदा हातात घेऊ शकत नाही.

उपलब्ध माहितीनुसार राज्यातील सर्व सहकारी निबंधक या उपविधी दुरूस्ती प्रकरणांच्या मंजुरी / नामंजुरी ची प्रकरणे प्रलंबित ठेवण्याबाबत कायद्याने कचाट्यात सापडले आहेत. घटनाबाह्य आदेशांची अंमलबजावणी होऊ शकत नाही. एकंदरीत ९७ वी घटनादुरूस्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दुरूस्ती व उपविधी दुरूस्ती हे तांगडे कसे सोडवायचे हा खरा प्रश्न राज्यापुढे आहे. लोकप्रतिनिधींच्या व तज्ञांच्या अनेक समित्या ह्या कामासाठी अस्तित्वात आल्या. त्यांच्या बैठका झाल्या. अद्याप कुठलाही निर्णय अधिकृतरित्या झालेला नाही. परंतु प्रसार माध्यमांमध्ये याबाबत आलेल्या उलट-सुलट बातम्या व माहितीवर विश्वास ठेवण्याव्यतिरिक्त कोणाच्याही हातात काही नाही. यासाठी न्यायालयाचेच दरवाजे ठोठावले जातील व महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांना त्यामुळे निश्चित दिशा मिळेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**